कृषिविषयक आकडेवारीचा वेळेवर अहवाल देण्याच्या योजनेस सन २०१७-१८ करीता प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

शासन निर्णय क्रमांकः सांख्यिकी -२०१७/प्र.क्र.१४८/११-अे

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई-४०० ०३२.
तारीख: २७ डिसेंबर, २०१७

वाचा -

१. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/ आ.पु.क., दि.१८.०४.२०१७
२. भारत सरकार, कृषि मंत्रालय, कृषि व सहकार विभाग यांचे पत्र २-३/२०१७/ASI-ES, दि.१८.०५.२०१७
३. कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र.सां.-५/टीआरअे/२४/२०१७, दि.२६.०५.२०१७
४. शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्र. पदसातत्य -२०१७/प्र.क्र.२५/११-अे, दि.१३.१०.२०१७

प्रस्तावना -

महाराष्ट्र राज्यातील कृषिविषयक आकडेवारीचा वेळेवर अहवाल देण्याची योजना या योजनेकरिता केंद्र शासनाने सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी महाराष्ट्र राज्याकरिता उपरोक्त दिनांक १८.०५.२०१७ च्या पत्रान्वये रु.२५७.०० लाख इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

२. महाराष्ट्र राज्यातील कृषिविषयक आकडेवारीचा वेळेवर अहवाल देण्याची योजना या १०० टक्के केंद्र पुरस्कृत योजनेतील ५८ अस्थायी पदे दिनांक १ ऑक्टोबर, २०१७ ते ३१ डिसेंबर, २०१७ पर्यंत चालू ठेवण्यास उपरोक्त दिनांक १३.१०.२०१७ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

३. महाराष्ट्र राज्यातील कृषिविषयक आकडेवारीचा वेळेवर अहवाल देण्याची योजना या १०० टक्के केंद्र पुरस्कृत योजनेस केंद्र शासनाने दिलेल्या प्रशासकिय मान्यतेच्या मर्यादेत व राज्य शासनाच्या श्वेतपुस्तिकेप्रमाणे (White book) सन २०१७-१८ मध्ये मंजूर केलेल्या तरतूदीनुसार राज्य शासनाची बाबनिहाय प्रशासकीय मान्यता देण्याकरिताचा प्रस्ताव कृषि आयुक्तालयाने उपरोक्त दि.२६.०५.२०१७ च्या पत्रान्वये सादर केलेला आहे. अनुषंगाने उपरोक्त योजनेला सन २०१७-१८ या वर्षाकरीता प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र राज्यातील कृषिविषयक आकडेवारीचा वेळेवर अहवाल देण्याची योजना ही १०० टक्के केंद्र पुरस्कृत असून या योजनेकरिता सन २०१७-१८ साठी पुढील तक्त्यात दर्शविण्यात आल्यानुसार रु.२५७.०० लाख इतक्या रकमेस शासनाची प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

(रक्कम रुपये लाखात)

अ.क्र.	बाब	सन २०१७-१८ अर्थसंकल्पित तरतूद	सन २०१७-१८ केंद्र शासनाने दिलेली प्रशासकीय मान्यता	सन २०१७-१८ राज्य शासनाची प्रशासकीय मान्यता
१	०१-वेतन	२९१.००		
२	११-देशांतर्गत प्रवास खर्च	२.००	२५७.००	२५७.००
३	१३-कार्यालयीन खर्च	४.००		
४	१६-प्रकाशने	२.००		
५	२४-पेट्रोल व वंगण	१.००		
	एकूण	**३००.००**	**२५७.००**	**२५७.००**

२. प्रस्तुत खर्च खालील लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ करिता मंजूर केलेल्या अर्थसंकल्पीय तरतूदीतून भागविण्यात यावा -

"मागणी क्रमांक डी-३, २४०१, पीक संवर्धन,
(००) (१११) कृषि अर्थशास्त्र व सांख्यिकी
(००) (०९) कृषिविषयक आकडेवारीचा वेळेवर अहवाल देण्याची योजना,
(१०० टक्के केंद्र पुरस्कृत) (२४०१ २५६९)"

३. प्रस्तुत प्रयोजनार्थ सहाय्यक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे- ५ यांना आहरण व संवितरण अधिकारी तर कृषि संचालक, (विस्तार व प्रशिक्षण)यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१२२८११५६०२३८०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sharad Balkrishna Pawaskar

Digitally signed by Sharad Balkrishna Pawaskar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture and Adf Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f4ebb91d526d59e93b9365fba816854d2dfa38e53ed59ae4b31ba8260ba52882, cn=Sharad Balkrishna Pawaskar
Date: 2017.12.28 12:01:10 +05'30'

(श.बा.पावसकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे (५ प्रती)

२. कृषि संचालक (वि.प्र.), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५
३. मुख्य सांख्यिक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५
४. सहाय्यक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५
५. सहाय्यक संचालक (अर्थसंकल्प), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५
६. महालेखापाल, (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
७. संचालक, लेखा व कोषागारे, नवीन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
८. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
९. वित्त विभाग (व्यय-१) / (अर्थसंकल्प-१३) / (अर्थोपाय), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
१०. नियोजन विभाग (कार्यासन-१४३१), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
११. प्रधान सचिव (कृषि) यांचे स्वीय सहाय्यक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
१२. सहसचिव (११-अे) यांचे स्वीय सहाय्यक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
१३. कक्ष अधिकारी (२-अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३
१४. निवड नस्ती, का.११-अे.